# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१२ जानेवारी,२०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ११/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, भद्रावती, शेंगाव, नागभिड, मुल, पाथरी, सिंदेवाही, पोंभुर्णा, कोठारी, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०२ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **७,३३,०००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपूर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १) पोलीस स्टेशन बल्लारशहा :—

दिनांक **११/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशहा** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हे सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **बल्लारशहा** येथे अप. क्र. ४६/२०१९ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,३९५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **बल्लारशहा** पोलीस करीत आहे.

---